अर्ज क्र.. 630
अर्जदारचे नांव :: Adv. Prem Khade
दाखलेचा अर्ज आला तो दिनांक 31/12/25
दाखल तयार वि.:-
दाखल दिली तो दि.) 27/1/2026

महा./ 2055 /२०२५ पुणे
दिनांक 23 /12 /२०२५ पुणे

परिशिष्ट 'ब'

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

ज्ञापन

****

आधीक्षक
धर्मादाय आयुक्त नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

१) संस्थेचे नाव: 'कृष्णाली फाउंडेशन'

२) संस्थेचा पत्ता: द्वारा: श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड, रा. ७३८ करंजेपुल, ता. बारामती, जि. पुणे ४१२३०६

३) संस्थेचे कार्यक्षेत्र: महाराष्ट्र राज्य

४) संस्थेचे उद्देश:सदरची संस्था हे सर्व जाती जमाती, पंथ, व्यक्ती, सांप्रदाय, गट, वर्ण या सर्वांकरीता खुले असेल. त्याचा उद्देश हा संपूर्णरित्या शैक्षणिक समाजिक व बहुद्देशीय स्वरुपाचा असेल. संस्थेचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे:—

अ) शैक्षणिक:—

Asst. Charity Commissioner Pune

१. सामान्यत: भारतातील व विशेषकरुन महाराष्ट्रातील तरुण पिढीमध्ये शिक्षणाचा प्रसार, प्रचार करणे, त्यासाठी मराठी, हिंदी व इग्रंजी माध्यमातील प्रमाणशिल पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण, तसेच उच्च शिक्षणाच्या प्रगतीबरोबर वाड:मय, उद्योग, शेती, विज्ञान, तंत्रज्ञान, आध्यात्मिक, वाणिज्य, कला, व संगीत शिक्षण, कायद्याचे शिक्षण, गुरुकुल, संतपीठ, आश्रमशाळा, नाईट स्कुल, निवासी शाळा, शारीरिक शिक्षण, लष्करी शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक व बहुउद्देशीय शिक्षणाचा अंर्तभाव असलेले शिक्षण, शिक्षणशास्त्र, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, औषधनिर्मिती शाळा, संशोधन संस्था, औषध विज्ञान, पंचकर्म, आर्युवेद, नर्सिंग शिक्षण, पॅरामेडीकल अभ्यासक्रम, अभियांत्रीकी शिक्षण, पशुवैद्यकीय शिक्षण, किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम, अंधशाळा, विकलांग तसेच बहुविकलांग करीता प्रशिक्षण केंद्र चालविणे, अपंगशाळा, मूकबधीरशाळा, मंतिमंद शाळा, अंधशाळा व कार्यशाळा सुरू करणे, तंत्रशिक्षण, शेतीविषयक सर्व प्रकारचे शिक्षण, सैनिकी कृनिष्ठ महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, व्यापार व व्यवस्थापकीय शिक्षण व संशोधन इत्यादी सर्व प्रकारचे शिक्षण, विविध संस्थांना त्यासाठी संलग्नता देणे तसेच यात समावेश नसलेल्या सरकार मान्य तसेच इतर कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाचा प्रचार, प्रसार, व शिक्षणाची

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

सोय करणे. टेक्निकल (तंत्रनिकेतन) स्कुल चालू करणे, तसेच विविध विषयांवरील इंजिनिअरींग कॉलेज सुरु करणे, कॉम्प्यूटर, ईलेक्ट्रानिक्स, सिव्हिल, सायन्स व इतर संबंधीत विषयांवर संशोधन व विकास साधणे, सर्व कौशल्य विकास आधारीत योजनाचा लाभ मिळवणे, तसेच कोचींग क्लास चालविणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे. भाषिक अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी कार्य करणे.

२. ग्रंथालय, सार्वजनिक वाचनालयात विविध उपक्रम राबविणे, काव्य वाचन, बालभवन सानेगुरूजी कथामाला, ग्रंथालय सप्ताह यामध्ये स्मृती व्याख्यानमाला, विविध पुरस्कारांचे वितरण करणे, जिल्हा साहित्यिक मेळावा, पुस्तक मित्र मंडळ स्थापने, महनीय वक्त्यांचे व पाहुण्यांचे विचारधन ऑडिओ आणि व्हीडियो कॅसेटव्दारे संग्रहित करणे, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यासाठी प्रशस्त अभ्यासिका स्थापन करणे. मुक्तव्दार व ग्रंथ देवघेव विभाग स्थापन करणे.

३. सामाजिक बांधीलकीची जाणिव ठेवून अनाथ व गोरगरीबांच्या मुलामुलींसाठी मदत करणे, वस्तीगृह, विविध शिष्यवृत्या देणे, पुस्तक, पतपेढी व शैक्षणिक गोष्टींची सोय करुन त्यांना मोफत पुस्तक व शालोपयोगी वस्तु पुरविणे. साक्षरता अभियानाचा प्रसार, प्रचार करणे, विविध ठिकाणी प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालविणे. ध्यानधारणा प्रशिक्षण केंद्र चालविणे.

४. अपंग, मुकबधीर यांच्यासाठी शैक्षणिक संस्था सुरु करणे, त्यांना व्यवसायभिमुख शिक्षणाचे मार्गदर्शन देणे, शैक्षणिक साहीत्य मोफत वाटप करणे.

ब) <u>वैद्यकीय:—</u>

५. गरीब व गरजु लोकांसाठी वैद्यकीय मदत करणे, वैद्यकीय शिबीरे आयोजित करणे, तसेच संस्थेच्या माध्यमातून फिरते हॉस्पीटल व सार्वजनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे, हॉस्पीटल्स्, मॅटर्निटी होम, नर्सिंग होम, रक्तपेढी(ब्लडबँक), ॲम्ब्युलन्स सेवा, आयबँक तसेच खेडयांमध्ये जावून वैद्यकीय शिबीरे आयोजित करणे व वैद्यकीय सेवा पुरविणे, संस्थेच्या माध्यमातून वृध्द व्यक्तींची काळजी घेणारे केंद्र म्हणजे नर्सिंग ब्युरो चालवणे, वृध्द व्यक्तींची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षण शिबीरे आयोजित करणे, विविध आरोग्य शिबीरांचे आयोजन, विविध चिकित्सा शिबीर, रक्तदान, नेत्रदान चिकित्सा, एड्स संबंधी जागरूकता, असाध्य रोगांच्या उपचाराकरीता

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

योग्य ती वैद्यकीय मदत, कुटुंब कल्याण कार्यक्रम, मादक पदार्थांचे सेवन विरूद्ध जागृती करणे, व्यसन मुक्ती केंद्र स्थापन करणे. पंचगव्य चिकित्सा केंद्र सुरु करणे.

क) <u>महिला कल्याण :—</u>

६. महिलांना स्वावलंबी जीवन जगण्याकरिता महिलांमध्ये उद्योगधंद्यांची आवड निर्माण करणे, त्यासाठी हस्तकला प्रशिक्षण केंद्र चालविणे. औद्योगिक मेळावे भरविणे व याव्दारे मार्गदर्शन करणे, नोकरी विषयक मार्गदर्शन केंद्र, महिला संरक्षण कार्यशाळा, बाल सेविका प्रशिक्षण केंद्र चालविणे तसेच स्वयंरोजगार व प्रशिक्षण केंद्र चालविणे. महिला बचतगटांना व्यवसायिक प्रदर्शनांमध्ये भाग घेण्यास पोत्साहन देणे.

७. महिलांना कायदेविषयक व्यवहाराची माहिती करून देणे. राष्ट्रीय विविध योजनांची माहिती करून देणे. महिला व बालकांचा विकास करणे. आर्थिक दुर्बल महिला, मुले, मुली, विधवा व इतर समाजातील घटकांसाठी वस्तीगृहांची सोय करणे.

ड) <u>सामाजिक व सांस्कृतिक:—</u>

८. सर्व राष्ट्रीय सण, उत्सव साजरे करणे, सार्वजनिक गणेशोत्सव, श्रीरामनवमी उत्सव, दुर्गोस्तव, दहिहंडी उत्सव, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, आण्णाभाऊ साठे जयंती, छत्रपती शाहु महाराज जयंती व इतर उत्सव साजरे करणे. समाजसुधारक व थोर पुरुषांच्या जयंती साजरी करणे, संस्कृती संवर्धन, त्यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, धर्मशाळा सुरु करणे.

९. आर्थिक दुर्बल व गरजुसाठी अनाथ आश्रम, वृध्दांसाठी वृध्दाश्रम सुरु करणे, सुशिक्षीत बेरोजगारांना नोकरी मिळवुन देण्यास सर्वोतोपरी मदत करणे, उद्योग सुरू करण्यासाठी मदत करणे. अन्नछत्र सेवा केंद्र चालविणे.

१०. भुकंप, वादळ, पूर, दुष्काळ, इ नैसर्गिक आपत्ती अथवा मनुष्य निर्मित हानी झाल्यास अशा वेळी आपस्तग्रस्तांना मदत करणे.

११. समाजातील अंधश्रध्दा चुकीच्या रूढी परंमपरा नष्ठकरण्यासाठी परिसंवाद घडवुन आणणे आणि यातुन समाज प्रबोधन करणे.

इ) <u>क्रीडा :—</u>

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

१२. व्यायामशाळा— योगा, विविध खेळ प्रशिक्षण केंद्र चालविणे तसेच त्याकरीता आवश्यक असणा—या वस्तुंचा पुरवठा करणे. युवकांमध्ये सर्व प्रकारच्या खेळांची व व्यायामाची आवड निर्माण करणे. त्यांना प्रशिक्षण देणे. खेळाचे व व्यायामाचे साहित्य उपलब्ध करुन देणे. सामने भरविणे.

१३. पारंपारिक देशी खेळांमध्ये युवकांना निष्णात व पारंगत करुन त्यांना स्पर्धांमध्ये भाग घेण्यास संधी उपलब्ध करुन देणे. धनुर्विद्या, ॲथलॅटिक्स, बॅटमिंटन, बॉस्केटबॉल, बुध्दीबळ, कॅरम, क्रॉसकंट्री, क्रिकेट, फुटबॉल, जिमनॅस्टीक, रिदमीक जिम्नॅस्टीक, हॉकी, हॅडबॉल, ज्युदो, खो—खो, कबड्डी, लॉनटेनीस, जलतरण, टेबलटेनीस, हॉलीबॉल, वेटलीफटींग, वॉटरपॉलो, फॅनसिंग, मल्लखांब, रोलरस्केटींग, सॉफटबॉल, सायकलींग, थ्रो बॉल, बेसबॉल, टेनिकाईड ऑदींबद्दल युवकांना माहिती देऊन त्यांच्या आवडीप्रमाणे खेळांमध्ये त्यांना निष्णात व पारंगत करुन त्यांना स्पर्धांमध्ये भाग घेण्यास संधी उपलब्ध करुन देणे. निष्णात व उत्कृष्ट प्रशिक्षकांची प्रशिक्षणासाठी नेमणूक करणे. पोहणे या क्रिडा प्रकारासाठी स्विमींग टॅकची सोय उपलब्ध करुन देणे. टेनिस, पावर लिफ्टिंग, कुस्ती, बॉक्सिंग, कार्ड रूम, रस्सीखेच तायकांदो, कराटे, रोप मलखांब; शूटिंग, मल्टी जिम ट्रेडमिल, व्यायम साहित्य उपलब्ध करून देणे. खुली व बंदिस्त व्यायम शाळा उभारणे.

Asst. Charity Commissioner Pune

फ) <u>पर्यावरण संवर्धन व कृषी विषयक:—</u>

१४. समाजातील शेतकऱ्यांना उपलब्ध जमीन पाणी हवामानानुसार पिकांची माहिती, लागवड पध्दती, कीड व रोग नियंत्रण कमीत कमी पाण्यावर जास्तीत जास्त उत्पादनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान व मार्गदर्शन उपल्बध करणे. संस्थेतर्फे शेतकरी मेळावे, कृषी मासिके, प्रकाशित करणे. पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन करणे, नदी स्वच्छता अभियान व माती संरक्षण.

१५. गौशाळा. गोसेवा, पंच गव्य, सर्व प्रकारचे गौ प्रोडक्टस निर्मीती व विक्री करणे. मत्स्य व्यवसाय, हायड्रोपोनिक शेती, नैसर्गिक शेती जागरूकता मेळावे, शेती उत्पादन प्रक्रियेत सौरऊर्जा उत्पादनांचा वापर वाढवण्यसाठी जागरूकता वाढवणे.

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

१६. दुष्काळ आवर्षण, अतिवृष्टी, जलप्रलय, महापूर, भूकंप, वादळ, अशा प्रकारच्या कोणत्याही नैसर्गिक व अन्य सामाजिक आपत्ती मध्ये सापडलेल्या आपत ग्रस्तांना सहाय्य करणे.

१७. अनेक समविचारी संस्था; व्यक्ती यांचेशी संलग्नता करुन संस्थेचे ध्येय, उद्दिष्ठे राबविण्यासाठी प्रयत्न करणे. 'कृष्णाली फाउंडेशन' या संस्थेचे विश्वस्त मंडळ/कार्यकारी मंडळ ज्यांना सर्व प्रशासकीय, आर्थिक तसेच इतर दैनंदिन कामकाज, कारभार हे संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे प्रदान करण्यात/सोपविण्यात आलेले आहेत अशा विश्वस्त ची/ कार्यकारी मंडळाची संपूर्ण नांवे, वय, पत्ता, धंदा, हुद्दा, व्यवसाय व राष्ट्रीयत्व ते पुढीलप्रमाणे:—

स.नं.	विश्वस्तांचे पूर्ण नांव व पत्ता	वय	पद/हुद्दा	राष्ट्रीयत्व	व्यवसाय
१.	सौ. रविना स्वप्निल गायकवाड रा. करंजेपूल, पुणे ४१२३०६	३०	अध्यक्ष	भारतीय	नोकरी
२.	श्री. अरूणा बाबासाहेब गायकवाड रा. करंजेपूल, पुणे ४१२३०६	६५	सचिव	भारतीय	गृहिणी
३.	श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड रा. दत्तात्रय संकुल समोर, करंजेपुल, पुणे ४१२३०६	३४	खजिनदार	भारतीय	नोकरी
४.	श्री. आदित्य पांडूरंग थोरात रा. गणराज पार्क, फ्लॅट एन ३, सं न ८/ए १, आबासाहेब पवार नगर, गॅली एन २, सांगवी पुणे ४११०२७	२२	सदस्य	भारतीय	नोकरी
५.	श्री. महेश शंकर शेळके रा. मानोरी, ता. राहुरी, अहमदनगर ४१३७०५	४०	सदस्य	भारतीय	नोकरी
६.	सौ. मंगल पोपट शेळके रा. जाधव वस्ती, मनोरी, राहूरी, अहमदनगर ४१३७०५	५५	सदस्य	भारतीय	गृहिणी
७.	सौ. विदया महेश शेळके रा. खिळे वस्ती, मनोरी, राहुरी, अहमदनगर ४१३७०५	४१	सदस्य	भारतीय	गृहिणी

वरील सर्व आम्ही 'कृष्णाली फाउंडेशन' या नावाची संस्था स्थापन करू इच्छितो व संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी करू इच्छितो त्या करीता आम्ही वरील सर्व सदस्य

अध्यक्ष

सौ. रविना गायकवाड

सचिव

श्री. स्वप्निल गायकवाड

खजिनदार

श्री. आदित्य थोरात

एकत्र येवून आज रोजी दि. ०२/११/२०२५ या दिवशी सदर ज्ञापनावर स्वाक्षरी करीत आहोत.

अ. क्र. सभासदांचे नाव	स्वाक्षरी
१. सौ. रविना स्वप्निल गायकवांड	
२. श्री. अरूणा बाबासाहेब गायकवाड	
३. श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड	
४. श्री. आदित्य पांडूरंग थोरात	
५. श्री. महेश शंकर शेळके	
६. सौ. मंगल पोपट शेळके	
७. सौ. विदया महेश शेळके	

वरील सर्व इसमांना मी ओळखत असुन त्यांनी माझ्या समक्ष या ज्ञापनावर स्वाक्षरी केलेल्या असून त्या सर्वांना मी ओळखतो.

श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड.
(अर्जदार)
स्थळ :पुणे

Adv. Prem G. Khade
LL.B.
En. No.MAH/1657/2020
Office No.130, Ashoka Mall
Bund Garden Pune- 41100
Mob.No. 9765394191

Asst. Charity Commissioner Pune

ॲड. प्रेम जी. खाडे,.
मो.९७६५३९४१९१.

दिनांक :०३/११/२०२५

प्रमाणपत्र

'कृष्णाली फाउंडेशन' द्वारा: श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड, रा. ७३८ करंजेपुल, ता. बारामती, जि. पुणे ४१२३०६ या नावाची अथवा नावात साम्य असणारी दुसरी कोणतीही संस्था पुणे जिल्हात १८६०च्या संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी झालेली नाही.

श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड
(अर्जदार)

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

महा./2055/२०२5 पुणे
दिनांक 23/12/२०२5 पुणे

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

परिशिष्ट 'क'
नियम व नियमावली

****

संस्थेचे नाव: 'कृष्णाली फाउंडेशन'

संस्थेचा पत्ता: द्वारा: श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड, रा. ७३८
करंजेपुल, ता. बारामती, जि. पुणे ४१२३०६

संदर्भीय शब्दांची व्याख्या:—

अ) संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था व न्यास.

ब) **नियम व नियमावली:** संस्था नोंदणी अधिनियम म्हणजे सन १८६० चा भारत सरकारचा कायदा व त्याखाली संस्था स्थापन करताना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम.

क) **कार्यकारी मंडळ** म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार संस्था स्थापनेच्या वेळी व नंतर संस्थेच्या सर्वसाधारण सभेत निवडुन येणारे कार्यकारी मंडळ किंवा विश्वस्त की ज्यांचेवर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपवली आहे, अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व अन्य आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

ड) **सभासद:** संस्थेची नियम व नियमावली मान्य असणारी व कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली नियमीतपणे वर्गणी भरणारी व्यक्ती संस्थेची सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

ई) अनुसुची:या नियमावली सोबत जोडलेल्या स्वतंत्र अशा अनुसुची १,२,६ की ज्या सन १९७१ च्या संस्था नोंदणी नियमाप्रमाणे आहेत.

फ) उद्देश: ज्ञापनात नमुद केलेले उद्देश की, ज्या करिता संस्था स्थापन करण्यात येत आहे.

१. **संस्थेचे कार्यक्षेत्र:—** संस्थेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहील.

२. **हिशोबाचे वर्ष:—** संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

३. सभासदांचे प्रकार:—

अ) संस्थापक सभासद, ब) सामान्य सभासद, क) आजीव सभासद

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य धोरात

अ) <u>संस्थापक सभासद</u>:— संस्था स्थापनेच्यावेळी संस्थेला जे सभासद एकरक्कमी रू. १०१/— देतील व संस्थेच्या ध्येय धोरणांनी प्रेरीत होऊन संस्थेच्या ज्ञापनावर सहया करतील अशा सभासदांना संस्थापक सभासद संबोधण्यात येईल. संस्थापक सभासद हे आजीव सभासद असतील.

ब) <u>सामान्य सभासद</u>:— जे सभासद संस्थेची वार्षिक वर्गणी रू. ५०१/— एकरक्कमी पूर्ण भरतील, त्यांना सामान्य सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

क) <u>आजीव सभासद</u>:— संस्थेचे संस्थापक सभासद हे आजीव सभासद असतील. त्याव्यतिरीक्त जी व्यक्ती एकरक्कमी रू. ५००१/— संस्थेला देईल व कार्यकारी मंडळ अर्जदाराचा विहीत नमुन्यातील अर्ज स्विकारून अर्जदाराने जमा केलेल्या रक्कमेची पावती देतील, त्यानंतर ती व्यक्ति संस्थेची आजीव सभासद म्हणून संबोधण्यात येईल


४. **सभासद व त्याची नोंदणीची पध्दत**:— वर नमूद कोणत्याही प्रकारचा सभासद होण्यासाठी त्या व्यक्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली, मानसिकदृष्टया सुदृढ, कोणत्याही आर्थिक, सामाजिक गुन्हयांमध्ये पोलीसांनी पाठविलेल्या चलनामध्ये नाव नसलेली असावी, त्या व्यक्तीला सामाजिक कार्याची आवड व भारताचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. संस्थेचे नियम व नियमावली तसेच ध्येय व धोरणे मान्य असणाऱ्या सज्ञान व्यक्तीस सभासद होता येईल.

<u>आजीव सभासद पात्रता</u>:— आजीव सभासद होवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने संस्थेच्या विहीत नमुन्यात अर्ज संस्थेच्या सचिवाकडे दाखल करणे बंधनकारक आहे, प्राप्त झालेला अर्ज संस्थेचे सचिव कार्यकारी मंडळाच्या मान्यतेसाठी सभेपुढे ठेवतील व कार्यकारी मंडळाच्या मान्यतेनंतर तो अंतिम मंजुरीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येईल व त्या अर्जास वार्षिक सर्वसाधारण सभेने बहुमताने मंजूरी दिल्यानंतर त्या व्यक्तीस सभासदत्व दिल्याबाबत लेखी स्वरूपात संस्थेद्वारे कळविण्यात येईल. स्विकृतीपत्र प्राप्त झाल्यानंतर त्याने आठ दिवसांच्या आत आजीव सभासदाकरिता रक्कम रू. ५००१/— संस्थेच्या खजिनदाराकडे रोख/डीमांड ड्राफ्ट द्वारे भरून रितसर पावती घेणे

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

आवश्यक राहील. सभासद होवू इच्छिणाऱ्या व्यक्तीचा अर्ज अमान्य झाल्यास, अमान्यतेची कारणे दाखविणे संस्थेवर बंधनकारक नाही. अर्ज स्विकृतीनंतर व अर्जदाराने रितसर पैसे भरल्यानंतर त्या व्यक्तीचे नाव संस्थेच्या सभासद यादीमध्ये आजीव सभासद म्हणुन नोंदविण्यात येईल. अशा नव्याने नोंद झालेल्या अर्जदारास सभासदाच्या पात्रतेच्या अटी लागू राहतील. आजीव सभासदाचा मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबातील सभासद पात्रता पूर्ण करणाऱ्या व इच्छुक व्यक्तीस प्राधान्याने सभासद करता येईल.

<u>सामान्य सभासदाची पात्रता</u>:— सामान्य सभासद होण्यास वरील सर्व अटी व शर्ती लागू राहील. वार्षिक सभासद फी रक्कम रू. ५०१/— राहील. अर्जदाराने विहीत नमुन्यातील अर्ज केल्यानंतर त्यास कार्यकारी मंडळाची मंजूरी सभासद होण्यासाठी आवश्यक आहे. सभासद झाल्यानंतर त्यांचे नाव आर्थिक अगर सामाजिक गुन्हयामध्ये असल्यास त्याचे सभासदत्व आपोआपच रद्द होईल. सामान्य सभासदास सर्वसाधारण बैठकीत भाग घेता येईल. तसेच एखादया विषयाच्या ठरावास मतदान करता येईल.



५. **सभासदत्व रद्द करणे**:— अ) एखादया सभासदाचा मृत्यू झाल्यास, नादार ठरल्यास, शारिरीक अथवा मानसिक दौर्बल्य आल्यास, ब) संस्थेच्या एखादया सभासदाने राजीनामा दिल्यास व तो कार्यकारी मंडळाने स्विकारल्यास क) एखादया सभासदास फौजदारी गुन्हयासाठी शिक्षा झाल्यास, ड) संस्थेच्या हितास बाधक असे कृत्य केल्यास त्या सभासदास सदर कृत्याबद्दल खुलासा करण्याची संधी देवुन सभासदत्व रद्द करण्यात येईल, इ) संस्थेच्या तीन सर्वसाधारण सभेस गैरहजर राहील्यास इ. कारणांनी सभासदत्व रद्द होईल.

६. **वार्षिक सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्य**:— संस्थेच्या नियमाप्रमाणे सभासदत्व प्राप्त झाल्यास व मतदानाचा अधिकार असलेल्या सर्व सभासदांची मिळुन सर्वसाधारण सभा होईल. कोणत्याही परिस्थितीत संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्यात कार्यकारी मंडळाने अशी सर्वसाधारण सभा बोलविली पाहीजे. कार्यकारी मंडळाने त्याची अंमलबजावणी केली नाही तर ३/४ सभासद एकत्र येवुन अशी सभा घेणेबाबत योग्य ते

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

निर्णय घेऊ शकतील आणि त्यानुसार होणाऱ्या सभेत झालेले ठराव कार्यकारी मंडळावर बंधनकारक राहतील.

अधिकार व कार्ये:— वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च, ताळे बंद अहवाल, मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून दाखविला जाईल तसेच पुढील वर्षासाठीचे अंदाजपत्रक तयार करणे व या सर्वांच्या प्रति वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांना दिल्या जातील. कार्यकारी मंडळाची निवड करणे व निवडणूकीचे निकाल जाहीर करणे, पुढील वित्तीय वर्षासाठी चार्टर्ड अकौंटंट अथवा ॲथोराईज्ड ऑडीटर नेमणे, नियम व नियमावलीमध्ये दुरूस्त्या आल्यास त्याला मान्यता देणे, उद्देशपुर्तीसाठी संस्थेच्या ध्येय धोरणानुसार चर्चा करणे व निर्णय घेणे. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व इतर सभासदांनी सभेपुढे आणलेली कामे करणे, त्याचप्रमाणे अशा सभेत वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येईल. संस्थेच्या सर्व बाबतीत या सभेचा निर्णय अंतीम समजण्यात येईल.

७. **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या:—** कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी सेक्रेटरी अध्यक्षांच्या परवानगीने परिपत्रक काढुन सर्वसाधारण सभा बोलवतील. अशा परिपत्रकामध्ये सभेचे स्थळ व तारीख नमुद केलेली असेल. अशा नोटीसीचे परिपत्रक प्रत्येक सभासदाला सभेपुर्वी १५ दिवस अगोदर मिळेल अशी व्यवस्था असेल. नियम व नियमावलीमध्ये दुरूस्ती असेल तर नोटीस कमीत कमी पंधरा दिवस आधी दिली पाहीजे. वार्षिक सभेची नोटीस प्रत्येक सभासदाला पोस्टाने अथवा सही घेवुन देण्यात येईल. तथापि, बाहेरगावच्या सभेची नोटीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठवुनही न मिळाल्यास सदर सभेत मंजूर झालेल्या कामकाजास त्याची बाधा येणार नाही. संस्थेला उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रीत व निरीक्षक म्हणून कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजूरी घेऊन बोलविता येईल पण त्यांना सभेच्या मतदानात भाग घेता येणार नाही. सभेला कोरम पटावरील एकूण सभासद संख्येच्या ३/४ एवढी आवश्यक गणसंख्या राहील. परंतु, कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्धा तासाने बोलविली जाईल व अशा

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही व तिचे सर्व कामकाज कायदेशीर राहील. पण, वार्षिक सभेच्या नोटीसीतील तशी सूचना आवश्यक राहील.

८. **विशेष सर्वसाधारण सभा:—** कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखादया विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा बोलविली जाईल त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळण्यात येईल. तसेच पटावरील ३/४ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलविली पाहीजे.

९. **संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना:—** संस्थेचे ध्येय व उद्देश सफल करण्यासाठी व संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर असणाऱ्या सभासदांमधुन गुप्त मतदान पध्दतीने व लोकशाही मार्गाने कार्यकारी मंडळाची निवड बहुमताने करण्यात येईल. कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ११ सभासदांचे कार्यकारी मंडळ ५ (पाच) वर्षाकरीता निवडुन दिले जाईल. कार्यकारी मंडळ आपल्यामधुन पदाधिकाऱ्यांची निवड करतील. संस्थेचे पहिले कार्यकारी मंडळ हे नियुक्त राहील व त्यांची मुदत संस्था नोंदणीपासुन पाच वर्षापर्यंत राहील. आवश्यक वाटल्यास जादा स्विकृत सभासद नेमण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील, कार्यकारी मंडळ आपल्यामधुन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व आवश्यक वाटल्यास जादा पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करतील व इतर कार्यकारी मंडळ सभासद राहतील.

१०. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत:—** कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा पाच वर्षाचा राहील. दर पाच वर्षानी संस्थेच्या सभासद यादीवरून एकूण वैध मतदारांची यादी तयार करण्यात येईल. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावुन अशा सभेत वरील प्रमाणे नवीन कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पध्दतीने करण्यात येईल. (निवडणूकीची कार्यवाही जुन्या कार्यकारी मंडळाकडुन केली जाईल) निवडणूक होण्यापूर्वी एक महिना अगोदर मतदार यादी संस्थेच्या कार्यालयात प्रसिध्द केली जाईल. ज्या सभासदांनी आपली वर्गणीची रक्कम पूर्णपणें भरलेली आहे, असेच सभासद निवडणूकीत भाग घेण्यास पात्र

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

ठरतील व मतदान करू शकतील. समसमान मते पडल्यास अध्यक्षांना आपल्या पसंतीचे (कास्टींग वोट) मत देण्याचा अधिकार राहील.

११. **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे:—**

अध्यक्ष:— संपूर्ण संस्थेवर देखरेख ठेवणे, सर्वसाधारण बैठक, कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे आयोजन करणे, सर्वसाधारण सभेचा अजेंडा सभेच्या अगोदर सर्व सभासदास पोहोचेल याची दक्षता घेणे. धर्मादाय आयुक्तांकडे प्रत्येक आर्थिक अहवाल वेळेत पोहोचेल याची खबरदारी घेणे. कोणताही पदाधिकारी शारिरिक व मानसिकदृष्टया त्याचे काम पाहू शकत नसेल तर त्या पदाचा कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात कार्यकारीणीच्या दुसऱ्या सदस्याकडे सोपविणे, संस्थेस देणगीदार व इतर संस्थेकडुन आर्थिक मदत घेण्यासाठी प्रयत्न करणे.

उपाध्यक्ष:— अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांची सर्व कामे करणे व इतर वेळी अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे.

सचिव:— कार्यकारीणीत ठरलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे, अध्यक्षांच्या संमतीने सर्वसाधारण कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे आयोजन करणे, प्रत्येक सभेचे वृत्तांत नोंद करणे व त्याकरीता कायमचे रजिस्टर करणे. लेखा परिक्षण वेळेत धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाकडे पाठवून देणे. संस्थेचा सर्व पत्रव्यवहार चोख ठेवणे, नवीन होवु इच्छिणाऱ्या सदस्यांचे अर्ज स्विकारून व जाच पडताळणी करून नोंद करणे व कार्यकारीणीच्या बैठकीपुढे ठेवणे. सर्वसाधारण सभेचा अजेंडा सभेच्या किमान १५ दिवस अगोदर व कार्यकारी मंडळाच्या सभेचा अजेंडा सर्व सभासदास ८ दिवस आगोदर पाठविणे. संस्थेच्या सर्व रेकॉर्डचा ताबा सचिवाकडे राहील. तसेच सभासदांना मागणीवरून संबधीत कागदपत्रे दाखविली गेली पाहीजेत. तसेच अध्यक्षांच्या परवानगीने त्याच्या नकला घ्याव्यात. संस्थेच्या कार्यकारी मंडळाने संस्थेकरीता मोकळी जागा किंवा बांधलेली जागा खरेदी करावयाचे ठरविल्यास त्या अनुषंगाने जागेची निवड करणे. जागा मालकाशी बोलाचाली करणे व त्याची माहीती कार्यकारी मंडळाला देणे. जागेचा व्यवहार ठरल्यास त्यासबंधीचे खरेदीखत

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

संस्थेच्या नावे व संस्थेच्या वतीने अध्यक्ष व सचिव यांच्या नावे खरेदीखत करणे, बांधकाम करण्याबाबत संस्थेने किंवा कार्यकारी मंडळाने ठरविल्यास अगर बांधकामसंबंधीचे कामकाज ठेके पध्दतीने द्यावयाचे झाल्यास त्याबाबत योग्य त्या ठेकेदार निवडून लायक निवीदा मागवून कार्यकारीणीपुढे मंजूरीकरीता ठेवणे व ठेकेदाराची निवड झाल्यानंतर त्यांच्याशी योग्य ते करार, करून त्याची करावयाच्या तरतुदीनुसार नोंदणी करून घ्यावी. बांधकाम साहित्य कार्यकारीणीच्या मंजूरीनुसार योग्य त्या व्यापाऱ्याकडून खरेदी करणे तज्ञ व इतरांची नेमणूक करून बांधकाम करून घेणे. बांधकाम पुर्णतेची सक्षम अधिकाऱ्याकडुन दखल घेणे. संस्थेच्या गरजेपाटी स्थावर मिळकती विकत घेणे असल्यास व त्यास आर्थिक बाबत संस्थेस बांधकामाकरीता गरज भासल्यास वित्त संस्थेकडुन कार्यकारीणीच्या मान्यतेनुसार कर्ज प्रकरणे करणे. नोकर वर्ग महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व त्या त्या विभागाला लागू पडणाऱ्या कायद्यानुसार निवड करावी.

खजिनदार:— संस्थेचे वार्षिक व्यवहाराची योग्य त्या नोंदवहीत नोंद ठेवणे, कोणत्याही स्वरूपाने संस्थेकडे पैसे आल्यास त्याबाबतची संस्थेची पावती देणे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार कोणाही व्यक्तीस अगर संस्थेस पैसे दिल्यास त्याबाबतची संस्थेची पावती करणे. रक्कम रू. १,०००/— पुढील रक्कमेचा व्यवहार धनादेशाव्दारे करावा. खजिनदाराकडे रोख रक्कम रू. १,०००/— पर्यंत ठेवता येईल व त्यापुढील रक्कम संस्थेच्या नावे बॅकेत जमा करावी. संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचा ताळमेळ महिना अखेरीस करावा. अंतर्गत हिशोब तपासणीस यांना त्यावेळी आर्थिक बँकेची पुस्तके इ. उपलब्ध करून घ्यावी.

सदस्य:— संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभांना वेळोवेळी हजर राहणे, संस्थेच्या कामात सूचना, हरकती, मते, मांडुन चर्चा करणे तसेच इतर पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कामात मदत करणे व संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी सतत प्रयत्नशील राहणे.

१२. **कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीच्या सभा**:— कार्यकारी मंडळाची सभा ही दर ३ महिन्याने म्हणजेच वर्षात कमीत कमी ४ वेळा घ्यावी लागेल. कार्यकारी मंडळाची सभा अध्यक्षांच्या

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

सुचनेनुसार सचिव बोलावतील. अशा सभेची नोटीस सभेपूर्वी किमान ८ दिवस अगोदर अध्यक्षांच्या संमंतीने संस्थेच्या सेवकामार्फत अगर टपालाने कार्यकारी मंडळाच्या सभासदांना पाठविण्यात येईल. नोटीसीमध्ये सभेची तारीख, वेळ व सभेपुढील कामकाजाचे विषय इ. बाबींचा समावेश असेल. सभेस किमान ३/४ सभासदांची उपस्थिती आवश्यक राहील. गणसंख्येअभावी अशी सभा तहकूब करावी लागल्यास त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्धा तासाने सभा घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही. कार्यकारी मंडळाच्या २/३ सभासदांनी लेखी अर्ज केल्यास किंवा कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखादया विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाची एखादी विशेष सभा अध्यक्ष बोलावतील अशा सभेत कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व नियम पाळले जातील.

१३. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या**:— कार्यकारी मंडळाच्या सभासदांना सभेपूर्वी ८ दिवस अगोदर नोटीस पाठविणे आवश्यक आहे. पण तशाच प्रसंगी अध्यक्षास फक्त एक दिवसाची समक्ष सही घेऊन नोटीस तातडीने सभा बोलविण्याचा अधिकार राहील. आर.पी.एडी. ने पाठविलेली नोटीस एखादया सभासदास वेळेवर मिळाली नाही तर त्यामुळे बोलविलेली सभा बेकायदेशीर ठरणार नाही. विशेष प्रसंगी वेळेच्याअभावी एखादया तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे झाल्यास सचिव हा अध्यक्षांच्या परवानगीने कार्यकारणीच्या सभासदांकडे लेखी मत मागवून घेईल व मताधिक्क्यावरून तो ठराव अगर निर्णय संमत व असमंत झाला असे समजण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या सभेचा कोरम ३/४ असा राहिल. कोरमअभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्धा तासाने बोलविली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता भासणार नाही.

Asst. Charity Commissioner, Pune

१४. **कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम**:— संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मुदत ५ **वर्षे** राहील. दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारीणीची निवड केली जाईल. ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीसमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल. नोटीस १५

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

दिवस अगोदर प्रसिध्द केली जाईल. नोटीस प्रसिध्द करतेवेळी उमेदवारी अर्ज मागविणे, त्याची छाननी करणे इ. बाबींसाठीची प्रक्रीया पूर्ण केली जाईल. कार्यकारी मंडळाची निवडणूक वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांमधुन गुप्त मतदान पध्दतीने होईल. आवश्यकता भासल्यास कार्यकारी मंडळ निवडणुक अधिकाऱ्याची निवड करतील. अशावेळी निवडणुक अधिकारी हे निवडणुकीची प्रक्रीया लोकशाही पध्दतीने व पारदर्शकपणे पार पाडतील. निवडणुक अधिकारी यांना स्वतंत्र निवडणुक कार्यक्रम राबविण्याचा अधिकार राहील. निवडणुक अधिकारी यांनी निवडणुकीची पध्दत ठरविल्यास ती अंतीम राहील व त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळ, पदाधिकारी अथवा संस्थेचे सदस्य यांना राहणार नाही.

१५. **कार्यकारी मंडळातील रिक्त पदांबाबत**:— मृत्यु, राजीनामा अगर इतर कारणाने कार्यकारी मंडळातील पद रिक्त झाल्यास त्या जागी तात्पुरती अध्यक्षांची नेमणूक करतील व नंतर कार्यकारी मंडळातील राहिलेले अन्य सदस्य बहुमताने भरतील व तसा बदल अर्ज विहीत नमुन्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सो पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

१६. **सभासदांचे हक्क व कर्तव्ये**:—

अ) **सभासदांचे हक्क** :— सर्व सभासदांना संस्थेच्या सर्वसाधारण सभेत उपस्थित राहून चर्चा करण्याचा अधिकार राहील व संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सहभागी होता येईल. तसेच लेखी सूचना, तक्रारी व दाद मागण्याचा अधिकार राहील. संस्थेच्या सभासदांना कमीत कमी ३/४ किंवा त्यापेक्षा जास्त सभासदांच्या सख्येने तातडीच्या सभा बोलविण्याचा हक्क राहील. संस्थेच्या वेळोवेळी होणाऱ्या सभांच्या सूचना व वार्षिक अहवाल मिळविण्याचा अधिकार राहील. संस्थेचा जमाखर्च व इतर आवश्यक माहीती विचारण्याचा हक्क राहील.

ब) **सभासदांची कर्तव्ये**:— संस्थेच्या प्रत्येक सभेला उपस्थितीत राहणे, संस्थेच्या कामकाजावर देखरेख करणे, संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे, पदाधिकाऱ्यांना सहकार्य करणे, सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते वा

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

नाही ते पहाणे, संस्थेच्या विकासाकारीता निधी उभारण्यास मदत करणे, संस्थेच्या विविध कार्यक्रमामध्ये सक्रिय सहकार्य करणे, संस्थेस स्वत:च्या मालकीची जागा घेण्यास मदत करणे, तसेच देणग्या मिळविण्यासाठी प्रयत्न करणे

१७. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये**:— संस्थेकरिता स्थावर मिळकत खरेदी अथवा भाडेतत्वावर शासनाकडुन अथवा निमशासकीय व स्वाय्यत्त संस्थेकडुन स्वीकारणे व तत्संबधी संस्थेच्या हितार्थ सर्व निर्णय घेणे. संस्थेचे सर्व विद्यमान स्थावर व जंगम मिळकत व पुढे वेळोवळी वा अन्य मार्गाने मिळालेली मिळकत संस्थेच्या व़तीने कार्यकारी मंडळांच्या ताब्यात राहील. स्थावर मिळकतीपासुन मिळणारे भाडे वा उत्पन्न वसूल करण्याचा तसेच जंगम मिळकतीचे व्याज वा उत्पन्न वसूल करण्याचा तसेच जंगम मिळकतीचे व्याज व उत्पन्न करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेच ध्येय व उददेश साध्य करण्यासाठी या संस्थेचे कार्य चालविण्याकरीता मंजूर केलेल्या रक्कमेचा विनीयोग करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेचे ध्येय उद्देश साध्य करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून नियम व पोटनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील, त्यावर कार्यकारी मंडळाचे नियंत्रण राहील. तसेच संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे, नोकरवर्गाची नेमणूक करणे, त्यांना निवृत्त करणे, संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पाहणे, नवीन उपसमित्या नेमणे, हिशोब तपासणीसाकडुन जमाखर्च व ताळेबंद पत्रक तयार करून अहवाल तयार करणे, वार्षिक सभेत सादर करणे, संस्थेचे हिशोब सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार ठेवुन त्यांची परीक्षण चार्टर्ड अकौंटंट अथवा ॲथॉरॉइज्ड ऑडीटरकडुन करवून घेऊन विहीत नमून्यामध्ये मा. संस्था निबंधक, पुणे यांचे कार्यालयात दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यापासून ९० दिवसाचे आत पाठविण्याची तजवीज करणे, पुढील कार्याची रूपरेषा व अंदाजपत्रक तयार करणे व वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे, संस्थेच्या सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर त्यावर निर्णय घेणे, तसेच संस्थेच्या हितविरूध्द अगर ध्येय धोरणाविरूध्द आलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर निर्णय घेणे,

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

तसेच संस्थेच्या हिताविरूध्द अगर ध्येय धोरणाविरूध्द कार्य करणाऱ्या सभासदांविरूध्द योग्य ती कारवाई करणे व आवश्यक तर त्याचे सभासदत्व रदद करणे, वार्षिक सर्वसाधारण सभेने केलेले ठराव, आदेश व धोरण विषयक गोष्टी अंमलात आणणे, संस्थेने नेमलेल्या व्यक्तींची संबंधीत माहिती या विवरणे सन १८६० च्या संस्था नोंदणी नियम क्र ८ अन्वये अनुसुची २ च्या नमुन्यांत मा. सहाय्यक संस्था निबंधक, पुणे यांचेकडे वेळोवेळी पाठविणे.

१८. **संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग**:— संस्थेच्या उददेशपुर्तीसाठी सभासद वर्गणी, देणग्या, खाजगी व्यक्तीकडून तसेच शासकीय व निमशासकीय अनुदाने याव्दारे मिळणारे उत्पन्न हया सर्व रकमा हा संस्थेचा निधी समजणेत येईल. तसेच देणगीरूपाने, करार, खरेदी व अन्य मार्गाने मिळाणारी स्थावर व जंगम मालमत्ता संस्थेची मिळकत समजण्यात येईल.
वरील मार्गाने मिळणारी रक्कम संस्थेच्या उददेशपुर्तीसाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा पगार व इतर दैनंदिन गरजेसाठी वापरली जाईल. परंतू संस्थेच्या उददेशपुर्तीसाठी व्यावसायीक स्वरूपाची मदत केली तर त्याचा मोबदला दिला जाईल.

१९. **बॅक खाते**:— संस्थेचा सर्व निधी राष्ट्रीयकृत बॅकेत अथवा शेडयुल बॅकेत संस्थेच्या नावे खाते उघडुन ठेवला जाईल व हे खाते **अध्यक्ष, सचिव अथवा खजिनदार** या पैकी दोघांच्या सहीने चालविले जाईल.

२०. **कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद**:— संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. त्यापुर्वी महा. सा. वि. व्य. १९५० चे कलम ३६ व ३५ प्रमाणे मे. धर्मादाय आयुक्त पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल. तसेच ठेवी स्विकारता येतील.

२१. **स्थावर मालमत्ता व विक्री करणे यासंबधीची तरतूद**:— संस्थेस गरज वाटल्यास अथवा आवश्यक वाटल्यास स्थावर मिळकत खरेदी करता येईल. तसेच आवश्यक तेव्हा संस्थेची मालमत्ता विकता येईल. त्याबाबत संपूर्ण अधिकारी कार्यकारी मंडळास राहील. परंतू, त्यासाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळास महा. सा. वि. व्य. सन १९५० चे कलम ३६ अन्वये पूर्तता करून मा.

Asst. Charity Commissioner Pune

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांची पूर्व परवानगी घेण्यात येईल.

२२. **नियम व नियमावलीमध्ये बदल करण्याची तरतूद:—** कार्यकारी मंडळाने किंवा आजीव सभासदाने चालू नियम व नियमावलीमध्ये बदल किंवा दुरूस्ती सूचविली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/४ बहुमताने असा ठराव मांडुन मंजूर करण्यात येईल. मात्र घटना दुरूस्तीचा मसूदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला जाईल.

२३. **नाव आणि उद्देशात बदल:—** संस्थेचे नाव अथवा बदल करावयाचा असेल अथवा दोन संस्थांचे विलीनीकरण करावयाचे असेल तर सन १८६० च्या संस्था कायद्यातील कलम १२ नुसार किंवा १२ अ यातील असणाऱ्या तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

२४. **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत:—** १८६० चे संस्था नोंदणी अधिनियम कलम १५ नुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ च्या संस्था नोंदणी नियमातील नियम १५ प्रमाणे अनुसूची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल.

२५. **संस्थेचे विर्सजन:—** संस्था आर्थिक अडचणीत आल्यास, संस्थेचे विसर्जन करावयाचे झाल्यास ३/४ बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजूरी घ्यावी लागेल व संस्था नोंदणी सन १८६० चे अधिनियमातील कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल. संस्था विसर्जन करावयाची झाल्यास संस्थेची उर्वरित मिळकत, निधी व पैसा साम्य उद्देश व ध्येय असलेल्या संस्थाना देऊन आयकर कायदा १९६१ मधील कलम १२ अ अन्वये आयकर अधिकारी यांच्याकडे नोंदणी करण्यात येईल. तसेच संस्थेची कोणतेही मिळकत, निधी व पैसा सभासदांना घेता येणार नाही.

Asst. Charity Commissioner Pune

Asst. Charity Commissioner Pune

मही शिक्क्याची खरी नक्कल

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग पुणे.

27-1-16
मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

दाखला

प्रमाणित करण्यात येते की, **'कृष्णाली फाउंडेशन'** संस्थेचा पत्ता द्वारा: श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड, रा. ७३८ करंजेपुल, ता. बारामती, जि. पुणे ४१२३०६ या संस्थेच्या नियम व नियमावलीची खरी व सत्य प्रत आहे.

अध्यक्ष	सचिव	खजिनदार
सौ. रविना गायकवाड	श्री. स्वप्निल गायकवाड	श्री. आदित्य थोरात

सभासदांची नावे	सहया
१. सौ. रविना स्वप्निल गायकवाड	
२. श्री. स्वप्निल बाबासाहेब गायकवाड	
३. श्री. आदित्य पांडूरंग थोरात	

Asst. Charity Commissioner Pune

अध्यक्ष

सौ. रविना गायकवाड

सचिव

श्री. स्वप्निल गायकवाड

खजिनदार

श्री. आदित्य थोरात